# बडबड गीतातील पोपटपंची




सौ.स्वाती वर्तक

ई साहित्य प्रतिष्ठान

**बडबड गीतातील पोपटपंची - ई बालकविता संग्रह**

**कवी- सौ.स्वाती वर्तक**


**मुखपृष्ठ /सजावट  : अनघा हिरे**

**प्रकाशन : बालनेटाक्षरी**

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

E mail : balnetakshari@gmail.com

9422284116 / 9422249475

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

986967482



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध आपले वाचून झाल्यावर हे ई पुस्तक आपण फॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे. या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवयित्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी कवयित्रीची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts**

## परिचय

---



**नाव...सौ.स्वाती कुमार वर्तक**

**शिक्षण...एमए. बीएड. ( सुवर्णपदक प्राप्त )**

**मूळ स्थान..ग्वाल्हेर ..मध्यप्रदेश**

**शिक्षण स्थान ..ग्वाल्हेर ,आग्रा**

सौ.स्वाती वर्तक
203 आनंद धाम
दहावा रस्ता
खार (प)
मुंबई 52

प्रसिद्धी...दीडशेहून अधिक लेख, कथा ,कविता मैत्री अनुदिनी मध्ये प्रसिद्ध ."  इंग्रजी पुस्तकांची दखल " सदराखाली महाराष्ट्र टाईम्स मध्ये 3 लेख प्रसिद्ध.."जीवन दर्शन " एक पुस्तक प्रसिद्ध.

व्यवसाय...के.जी. ते एम ए पर्यंत अध्यापन..वेगवेगळ्या शाळा कॉलेजातून. वेगवेगळी पदे भूषविली. मुलांसाठी अनेक नाट्यछटा, नाटिका लिहून बक्षिसे. सर्वोत्तम शिक्षिका बक्षीस वेगवेगळ्या संस्थांतर्फे. .बालपणी पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी यांच्याकडून कौतुक

पत्ता...२०३ ,आनंद धाम
दहावा रस्ता
खार (प)
मुंबई ५२
भ्रमणध्वनी....९३२३५०५९०३

विशेष आवड.. लेखन, वाचन, चित्रकला, अनुवाद

## लेखिकेचे  आत्तापर्यंत ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे प्रसिद्ध केलेले इ बुक









# अर्पण पत्रिका

सर्व लहान मुलांसाठी
प्रेमपूर्वक ....

स्वाती आजी

# अनुक्रमाणिका


- अंक शिकू या गाता गाता
- *चला गरबा खेळू या*
- मासोळी
- आठवतो मला पार
- फक्त माया
- रोप
- रसाची वाटी
- समुद्रापलीकडे
- चिऊताई
- कुलूप
- पोपटपंची

# अंक शिकू या गाता गाता



एक, दोन, तीन, चार
आईस्क्रीम खाऊया, गारेगार



पाच, सहा, सात , आठ
मातीत रुजवू आंब्याची बाठ

नऊ ,दहा , अकरा , बारा
गोमातेला देऊ चारा



तेरा , चौदा , पंधरा , सोळा
कान्हा साजे काळासावळा

सतरा, अठरा , एकोणीस ,वीस
मोराचे आणले सुंदर पीस

पीस खोचू मुकुटात
कृष्ण बनूया थाटात

## <u>चला गरबा खेळू या</u>



या, गं या, या, गं ,या
या, गं सख्या साऱ्या या

मृण्मयी, मैत्रेयी, निर्मयी या
गरबा आपण नाचू या

देवीचा मंत्र म्हणू या
रात्री जागर करू या

टिपऱ्यांचा नाद घुमवू या
मातेचे आशीष घेऊ या

या गं ,या साऱ्या या

# मासोळी



मासोळी मासोळी
सुळकन  जाते
इकडून तिकडे
पोहत राहते

आई तिला वाजत
नाही का थंडी ?
ती तर घालत
नाही गं बंडी

मी खूप वेळ जेव्हा
पाण्यात खेळते
तू पटकन मला
बाहेरच काढते

मला पण उद्याच
मासोळी व्हायचंय
दिवसभर नुसतं
पाण्यात डुंबायचय

# आठवतो मला पार



आठवतो मला पार
शाळेसमोरचा
चिंचा बोरे विकणाऱ्या
आजीबाईचा.........1

असेल का गं आई, तेथे
अजून ती आजी ?
वाट बघत असेल का
बसून तेथे माझी ?........2

आता नाही शाळा

तर सुट्टी कशी होणार ?
त्या आजीजवळ मुले
गर्दी केव्हा करणार ?.........3

कोण मला देईल गं
ते अर्धे कच्चे लिंबू ?
मला जवळ घेत
करेल ओठाचा चंबू?............4

मला नाही आवडत
टीव्हीतली शाळा
घंटा वाजता टनटन
कोण म्हणतो "पळा" ..........5

देवा आता लवकर
माझी शाळा सुरू कर
पारावरची आजी देईल
तुला गोड गोड खोबरं..............6

देवा आता लवकर
माझी शाळा सुरू कर

पारावरची आजी देईल
तुला गोड गोड खोबरं

अरे, लबाडा, म्हणजे तुला
आवडत नाही बाई
शाळेपेक्षा प्रिय तुला
काय ती आजीबाई ?..........1

शाळेत जातो शिकायला
सांग मला खरे
का पळतो त्या आजीकडे
खायला चिंचा न बोरे ?..............2

गणित तुझे नावडते
कच्चे भाषा न भूगोल
आवडे फक्त खादाडाया
आवळे गोल गोल ?.................3

थांब ,सांगते बाबांना
आजच तुझे नाव
मिळणार नाही खेळणी
मार खाल ,राव .................4

नको न गं आई
मी तर केली गम्मत
ऑन लाईन शाळा छानच
असते आई शप्पत ...............5



# फक्त माया



आई, दूर कुठंतरी
अशी जागा आहे का ?
जेथे राहू शकतो फक्त
तू , मी , अन् बाबा

मिळत असतील तेथे
फक्त लाडू न् चिवडा
कोणी नसेल रागवायला
समजला का धडा ?

तेथे असेल फक्त
आईबाबांची माया
नको तुझा मोबाईल
सदा कानीं लावाया

संगणक ही नको
बाबांचे काम करायला
वेळ मिळेल त्यांना
मला जवळ घ्यावयाला

खरेच सांग न् एकदा
अशी जागा आहे का ?
खेळू शकाल   माझ्याशी
देऊन उंच उंच झोका



शाळेतून आल्यावर
तू घरी नसतेस
व्हिडिओवर मला फक्त
खोटी खोटी दिसतेस

शोधू या नं आई
अशी सुंदर जागा
बाबा वृक्षाची सावली
माऊलीचा गारवा

## रोप

आजी, आजी तू काय करते?
अगं, मी किनई रोप लावते




आजी, रोप म्हणजे काय असते ?
तुझ्यासारखे ते, झाडाचे बाळ असते

ते पण मोठे होणार का?
माझ्यासारखे बनणार का?



हो तर, तुझ्यापेक्षा होईल उंच
फुले,पाने, देईल चिंच



हे काय होणार चिंचेचे झाड ?
सावली देऊन करील तुझे लाड

सगळीच झाडे असतात छान
वारा,पाऊस याने करती गार

फुले किती रंगीबेरंगी सुंदर
गोड गोड फळात मऊ मऊ गर

वा..किती कामाचे हे रोप
मी पण लावू का ही मोप?

हो ,सर्व जण झाडे लावू या
आनंदाने गाऊ नाचू या



## रसाची वाटी

आई, मला दे ना गं
रसाची वाटी

नाही, आधी संपव ती
तुरीची आमटी

मला नाही आवडत
वरण आणि भाजी

मग, सांगणार नाही तुला
गोष्ट तुझी आजी

आजी नाही तुझ्यासारखी
खाष्ट ,दुष्ट आणि रागीट

हंsss, ! कोण म्हणतेय
आपल्या आईला वाईट ?

ऐकून मोठ्ठा आवाज
आपल्या बाबांचा

गप्पकन चंबू केला
त्याने ओठांचा

वरणाची वाटी
केली त्याने फस्त

भरभरून मिळाला रस
वाटीभर मस्त



# समुद्रापलीकडे

बाबांबरोबर गेले होते
पार समुद्रापलीकडे
गोऱ्या गोऱ्या मुली
होत्या जिकडे तिकडे...1

दोन दिवस तर मी
फार फार बिचकले
कोणालाच आपल्या
जवळ नाही केले....2

हळुहळू माझी
भीड जरा चेपली
ती परी गुलाबी
नित्य गोड हसली ...3

हॅलो म्हणून तिने
दाबला माझा हात
मी देखील हसून

दिली तिला साथ .….4

गणित माझे छान
वाटे तिला भारी
सुंदर माझे अक्षर
खुश होते स्वारी…...5

आता तर आमची
आहे इतकी गट्टी
कधी कधीच आम्ही
करत नाही कट्टी…...6

एकाच बाकावर
आम्ही रोज बसतो
दोघींचे डबे सदा
वाटूनच खातो…….7

मला आवडला तिचा
लिबर्टी चा सुंदर देश
तिला आवडतो माझा
युनिटी चा भव्य देश ….8

# चिऊताई

चिऊताई चिऊताई तू
सर्वांना का घाबरवते?
तू आता लुप्त होणार
असे साऱ्यांना वाटते



आमच्या घरी मात्र तू
दाराच्या आत सुद्धा येते
चिवचिवचिवाट करीत
दाणे खायला मागते

आई देते तुला मग
कणी, तांदुळाच्या छान
इकडे तिकडे बघत
उचलते वेळावून मान

एकदम येतो तेथे चिमणा
कलकलाट करतो फार
रागावून जणू विचारतो
काय सारे तूच खाणार ?





तू बोलत नाही काही
कारण तोंड तुझे बंद असते
चोचीत छोट्या पिल्लांसाठी
कणी ठासून भरली असते

भुर्रकन उडत जाते
झाडावरील घरोट्यात
आ वासून पिल्ले तुझी
वाट बघत असतात



भरवून त्यांना, पंख फुलवत
आमच्या अंगणी  परत येते
पण चिमण्याने तोवर सारे
मस्तपणे फस्त केले असते

आई म्हणते, थांब जरा
आणते अजून कणी
चिवचिव करत, फुदकत
खाते कशी तू झणी

# कुलूप



कुलूप बघून मला वाटते
कसे काय हे राखण करते ?

एवढासा तो अनघ जीव
चीजवस्तूंना होणार का शिव ?




ताई बाहेर जाते जेव्हा
कपाटाला कुलूप ठोकते तेव्हा

चोरांना ते काय अडवू शकेल ?
त्यांच्या जवळ का किल्ली नसेल?

बँकेमध्ये तर केवढे कुलूप
लागले असते चिडीचूप

पण त्याचीच राखण करण्या खरी
शिपाईदादांची लागते वारी

आणि शिपाईदादाला पण भीती दारी
म्हणून बंदूकीची गळयात मोठी दोरी

किती किती ही राखणदारी
तरीही चोऱ्या होतात भारी



# पोपटपंची




करू नको तू पोपटपंची
परीक्षेत आपली होईल गोची

अभ्यास नीट करायला हवा
मूळ मुद्दा समजायला हवा




नाहीतर वाजतील तीन तेरा
इकडून तिकडे जाईल वारा

गणिताचे उदाहरण करशील का पाठ ?
म्हणतील सारे रिकामा माठ

भूगोलात नुसता होईल गोंधळ
मतलाई वाऱ्याचे करशील वादळ

इतिहासात तुझे  होतील हाल
म्हणे अकबराचा ताजमहाल



सर्व विषयांची लागते वाट
ज्ञान बघून गुरुजी पडतात चाट

करू नको रे पोपटपंची
धारणा तुझी राहील कच्ची

बालमित्रांनो ,
तुम्हाला पुस्तक कसे वाटले आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्याला कोणती कविता जास्त आवडली हे स्वाती आजींना आठवणीने फोन करून कळवा.
लहान मुलांसाठी लिहिलेले साहित्य आम्ही कायम त्याचे स्वागत करू. योग्य साहित्याचे आम्ही नक्कीच छानसे ई बुक करू.
चला तर मग पाठवा आपले लिखाण पटापट खालील मेल आयडीवर. balnetakshari@gmail.com

तुम्ही मला या संदर्भात फोन सुध्दा करू शकतात. ९४२२२४९४७५
मग छान छान मराठी पुस्तक वाचत रहा आणि छान छान मराठी लिहीत रहा.

अनघा हिरे
संपादक
बालनेटाक्षरी